नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०७/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## पो.स्टे. खापरखेडा हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक ११/०७/२०२४ चे १८/०० वा. ते १८/५० वा. दरम्यान पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, यातील आरोपी राजेश श्रावण बंड वय 45 वर्ष राहणार दहेगाव रंगारी वार्ड क्रमांक चार खापरखेडा हा स्वत:चे पानठेल्यामध्ये कल्यान मटका सट्टापट्टीचे आकडे लिहून लोकांकडून पैसे घेवून लोकांना सट्टापट्टीचे आकडे लिहलेले कागद देवुन कल्यान वरली मटक्यावर हारजितचा जुगार खेळविताना मिळून आल्याने आरोपीचे पानठेल्याची झडती घेतली असता नगदी १३२०/—रू २) एक बॉल पेन ३) एक सट्टापट्टी गुलाबी रंगाचा लीहलेला कागद असा एकुण १३२०/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि. धनाजी जळक व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर